# INDEX


| S. No. | Ref. No. | Issued on | Title |
|---|---|---|---|
| 1. | PPI-PC/ 2011-4 | 10 October 2011 | Rate Chart for Residential/ Classroom/ Conference Hall at Management Development Centre, YASHADA |
| 2. | PPI-PC/ 2012-1 | 30 March 2012 | Library Membership |
| 3. | PPI-PC/ 2012-2 | 19 March 2012 | सन २०१२-१३ मध्ये सहकार प्रशिक्षण व संशोधन कक्षाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या पुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क दर (तीन दिवसीय निवासी / अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम) |

## YASHADA POLICY CIRCULAR

| | |
|---|---|
| Policy Circular Number | PPI-PC/2011-12 |
| Dated | October 10 2011 |
| Empowered Authority | Director General, YASHADA |
| Subject | Rate chart for Residential/ Classroom/ Conference Hall at Management Development Centre, YASHADA |
| Reference | MDC Policy Guidelines PPI-PC/2010-20 dtd.16th February 2010. |
| Circulated for information to | All ADGs, DDGs and OICs of YASHADA |
| Effective Date | 10th November 2011 |

**Amendment to Policy Circular No.PPI-PC/2010-20 issued on 16h February 2010.**

**<u>The following schedule and rates are applicable from 10th November 2011 onwards.</u>**

### A) RATES FOR RESIDENTIAL TRAINING PROGRAMME FACILITIES AT MDC:

- For programs where MDC, YASHADA hosts the participants and academic inputs are provided by the client organization:

#### 1) RATES FOR RESIDENTIAL FACILITY: -

| | |
|---|---|
| Charges per participant per day (twin sharing) | Rs.2,530/- |
| Charges per participant per day Executive room (Single) | Rs.3,800/- |
| Charges per participant per day Executive Suite | Rs.5,830/- |

Above rates are inclusive of lodging, boarding & classroom charges. Service Tax will be charged extra as per Government norms on total bill.

#### 2) RATES FOR NON-RESIDENTIAL FACILITY: -

| | |
|---|---|
| Charges including Classroom + lunch + 2 Classroom Tea per participant per day | Rs.700/- |
| Charges including Classroom + Breakfast, lunch + 2 Classroom Tea per participant per day | Rs.750/- |

Service Tax will be charged extra as per Government norms on total bill.

### B) RATES FOR ONLY ACCOMMODATION FACILITIES:

| | |
|---|---|
| Consolidated charges per participant per day (twin sharing) | Rs.2,200/- |
| Executive rooms (Single) | Rs.3,500/- |
| Executive Suite (Single) | Rs.5,500/- |

Above rates are inclusive of lodging & boarding only. Service Tax will be charged extra as per Government norms on total bill.

c) **RATES FOR NON-RESIDENTIAL FACILITIES:**

- The Conference Hall facilities inclusive of LCD projector, OHP, computer facilities, screen, white board and library facilities.

| Sr. No. | Details | Full Day | Half Day |
|---|---|---|---|
| 1. | Conference Hall No. 1, 2, 6 & 7. | Rs.8,000/- | Rs.5,000/- |
| 2. | Conference Hall No. 3, 4 & 5 | Rs.10,000/- | Rs.7,000/- |
| 3. | Syndicate Hall | Rs.4,000/- | Rs.3,000/- |
| 4. | MDC Auditorium | Rs.30,000/- | Rs.20,000/- |
| 5. | MDC Auditorium Basement | Rs.10,000/- | Rs.5,000/- |
| 6. | MDC Lawn | Rs.20,000/- | Rs.10,000/- |

Food charges for Non-residential participants will be charged extra as per policy circular No.PPI-PC/2011-12, Dt. September 07, 2011.

Service Tax will be charged extra as per Government norms on total bill.

The above all rates are pertaining to MDC services only. No academic / training cost included into MDC tariff.

**(Dr. Sanjay Chahande)**
**Director General**
**YASHADA**

**यशदा ग्रंथालय सभासदत्व धोरण परिपत्रक**

| | |
|---|---|
| Policy Circular No. | PPI-PC/2012-1 |
| Dated | 30/3/2012 |
| Subject | Library Membership |
| Empowering Authority | Director General, YASHADA |
| Circulated for Information to | All Faculty, Students etc. |
| Circulated for necessary action to | Senior Librarian<br>Librarian<br>Director, Center for Media & Publication |

यशदा ग्रंथालयाचा वापर ग्रंथालयाच्या स्थापनेपासून मुख्यत्वेकरून यशदात प्रशिक्षण घेण्यासाठी येणारे प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षण देणारे यशदातील विद्याशाखा अधिकारी, कर्मचारी करीत असतात. आवश्यकतेप्रमाणे यशदात व्याख्यानाकरिता येणारे पाहुणे व्याख्याते, शासकीय अधिकारी (शक्यतो पुणे स्थित) यांना सशुल्क ग्रंथालयाचे सदस्यत्व देण्यात येते. त्याच बरोबर विशिष्ट विषयांत संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना देखील ग्रंथालयाचा वापर संदर्भाकरीता करू देण्याची पध्दत आहे.

यशदात स्पर्धा परीक्षा केंद्राच्या स्थापनेनंतर या केंद्रातील विद्यार्थी देखील ग्रंथालयाचे सदस्य म्हणून वापर करीत आहेत. या विद्यार्थ्यांना विशेष सेवा म्हणून २४ तास खुली अशी अभ्यासिका ग्रंथालयातर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

'यशदा' संस्थेचा नांव लौकीक जसजसा वाढत जात आहे तसतसे यशदा ग्रंथालयाचा वापर करू देण्याची मागणीदेखील सातत्याने वाढत आहे. ग्रंथालयाचा वापर जास्तीत जास्त पात्र नागरिकांना करू देण्याबरोबरच सदस्यत्व देणे व वापर करू देण्याबाबत निश्चित असे धोरण असण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने पुढील धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१. यशदाच्या सेवेमधील कायम नेमणुकीवरील, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी, कर्मचारी तसेच करार तत्वावरील अधिकारी व कर्मचारी आणि यशदात निवासी प्रशिक्षणाकरीता आलेले प्रशिक्षणार्थी हे सेवेच्या/ प्रशिक्षणाच्या कालावधीत अनामत रक्कम अथवा वार्षिक शुल्काशिवाय ग्रंथालयाचा वापर करण्याकरीता पात्र असतील त्यांना देण्यात येणाऱ्या ग्रंथांची संख्या व ग्रंथपरतीची मुदत इ. बाबतचे नियम ग्रंथालय विभागप्रमुख वेळोवेळी परिस्थितीनुसार ठरवतील.

२. याखेरीज ग्रंथालयाचे सशुल्क सदस्यत्व हे निश्चित अशी अनामत रक्कम घेऊन फक्त महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनसेवेत असल्याची खात्री करूनच देण्यात येईल. त्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रतीखेरीज त्यांनी यशदातील कायम अधिकाऱ्यांची ग्रंथालय सदस्यत्वाकरीता शिफारस आणणे आवश्यक राहील.

३. यात सेवानिवृत्त राज्य व केंद्र शासकीय अधिकारी, निवृत्त यशदा अधिकारी व कर्मचारी (यशदामध्ये किमान सलग दोन वर्ष पूर्ण वेळ काम केलेले कर्मचारी/ अधिकारी) समाविष्ट असतील. त्यांच्याकरिता शुल्क ग्रंथालय विभागप्रमुख वेळोवेळी ठरवतील त्यानुसार राहील.

४. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांशिवाय इतर अभ्यासक व संशोधक यांना ग्रंथालय सेवेचा तात्पुरता वापर केवळ ग्रंथालय विभागप्रमुख यांच्या मान्यतेनंतरच देण्यात येईल. असे सदस्यत्व प्रथम केवळ एक वर्षाकरीताच असेल. या दरम्यान वर्षभरातील सदस्यत्वाचा वापर व इतर

बाबी लक्षात घेऊन सदस्यत्वाचे नूतनीकरणाबाबत निर्णय घेण्यात येईल. याकरीता यशदा मधील कायम नेमणुकीवर असलेल्या विद्याशाखा अधिकाऱ्याचे त्या व्यक्तीस ओळखत असल्याचे शिफारस पत्र आवश्यक असेल व त्यास सदस्यत्व हे केवळ ग्रंथ वापराकरिताच देण्यात येईल. अभ्यासिकेकरीता देण्यात येणार नाही. या करिता वार्षिक शुल्क व अनामत रक्कम ग्रंथालय विभागप्रमुख वेळोवेळी ठरवतील.

५. सेवेतील किंवा निवृत्त शासकीय अधिकारी, कर्मचारी व निवृत्त यशदा अधिकारी आणि अभ्यासक व संशोधक या सर्वांना सभासदत्वासाठी शासनमान्य ओळख प्रमाणपत्र (पासपोर्ट, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एक) आणि कायम निवासस्थानाचे प्रमाणपत्र (रेशनकार्ड, वीजेचे बिल यासारखे एक) याची प्रत सभासदत्वाच्या अर्जासोबत देणे अनिवार्य राहील. सेवेतील व निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना सवलतीच्या शुल्कासाठी त्याबरोबरच शासकीय सेवेची खात्री पटविणाऱ्या कागदपत्राची प्रतही द्यावी लागेल.

६. यशदामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा केंद्राद्वारे स्पर्धा परीक्षेकरीता ठराविक काळाकरीता तयारी करण्याकरीता निवड झालेले विद्यार्थीच केवळ यशदा ग्रंथालयाच्या अधिकृत अभ्यासिकेचा वापर करू शकतील. अशा निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी सदर केंद्राकडून प्राप्त झाल्यानंतरच ग्रंथालयाकडून तांत्रिक बाबी पूर्ण करण्यात येतील व विद्यार्थ्यांना ओळखपत्र व सदस्यत्व देण्यात येईल. हे सदस्यत्व स्पर्धा परीक्षा केंद्रातील प्रवेश काळापुरतेच मर्यादित असेल.

७. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांकरीता खरेदी केलेली पुस्तके व नोटस् केवळ त्या केंद्राद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच देण्यात येतील. इतर वाचकांना त्याचा वापर करता येणार नाही.

८. यशदामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या सर्व प्रकारच्या प्रशिक्षणांकरीता आलेले प्रशिक्षणार्थी हे फक्त त्या त्या प्रशिक्षणाच्या कार्यकालादरम्यान ग्रंथालयाचा निःशुल्क वापर करू शकतील.

९. यशदा ग्रंथालयाचे सदस्यत्व देणे किंवा अभ्यासिकेचा वापर करू देणे याबाबत ग्रंथालय विभागप्रमुख यांचा निर्णय अखेरचा असेल. तसेच प्रत्येक वाचक संवर्गाकरीता स्वतंत्रपणे नियम बनवण्याचा अधिकार ग्रंथालय विभागप्रमुखांकडे असेल.

१० विविध प्रकारच्या सदस्यत्वाकरीता अनामत रक्कम व वार्षिक शुल्क याबाबत दरवर्षी डिसेंबर महिन्यात आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता दर निश्चित केले जातील.

११. कोणत्याही संवर्गातील सदस्याकडून सदस्यत्वाचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार ग्रंथालय विभागप्रमुखांना राहील.

१२. सदस्यत्वासंबंधातील कोणतीही शंका/ वादविवाद उद्भवल्यास मा. महासंचालक, यशदा यांचा निर्णय अंतिम राहील.

वरीलप्रमाणे मान्य.

***सही/-***

Date: 30/3/2012

महासंचालक, यशदा

# <u>यशदा धोरण परिपत्रक</u>

| | |
|---|---|
| **धोरण परिपत्रक क्रमांक** | पीपीआय-पीसी/२०१२ - २ |
| **विषय** | सन २०१२-१३ मध्ये सहकार प्रशिक्षण व संशोधन कक्षाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या पुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क दर (तीन दिवसीय निवासी / अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम) |
| **संदर्भ** | सन २०११-१२ मधील सीसीटीआर प्रशिक्षण कार्यक्रमासाठीच्या प्रशिक्षण सवलत योजनेस मा. महासंचालक यांची मंजूरी. यशदा धोरण परिपत्रक क्रमांक पीपीआय-पीसी/पीसी – २ दिनांक १९ मार्च, २०१२. |
| **परिपत्रक प्रति** | राज्यातील सहकारी संस्थांसाठी. (जिल्हा बँकां /नागरी बँका/ पतसंस्था/ पगारदार पतसंस्था / अन्य सहकारी संस्था) |
| **कार्यान्वयीत दिनांक** | दिनांक ०१ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च, २०१३. |

यशदामधील राज्य ग्रामीण विकास संस्थेअंतर्गत सहकार प्रशिक्षण व संशोधन कक्ष (सीसीटीआर) यांचे वतीने राज्यातील सहकारी संस्थांच्या पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी व्यवस्थापन विकास विषयक (क्षमतावृध्दी) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रामुख्याने जिल्हा बँका, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, पगारदार पतसंस्था, तसेच अन्य सहकारी संस्था यांचे पदाधिकारी / अधिकारी सदर प्रशिक्षण कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहतात. सदर प्रशिक्षण कार्यक्रम संस्थां पुरस्कृत आहेत व त्यासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थी संख्येनुसार प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी सवलतीचे शुल्क आकारले जाते.

सन २०१२ -१३ मध्ये यशदामध्ये घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या प्रशिक्षणार्थींसाठी प्रतिदिन प्रति **प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण शुल्क सवलत योजना** खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | प्रशिक्षण शुल्क तपशील | प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क |
|---|---|---|
| १ | एक प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या एका सहकारी संस्थेच्या एक किंवा दोन प्रशिक्षणार्थींसाठी(प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | रुपये १३००/- |
| २ | एक प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या एका सहकारी संस्थेच्या तीन किंवा तीन पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींसाठी (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | रुपये १२००/- |
| ३ | पुणे शहरातील सहकारी संस्थेच्या किंवा अन्य सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणार्थींसाठी अनिवासी व्यवस्था. (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) (अनिवासी, फक्त दुपारचे एक जेवण व दोन चहा समाविष्ठ) | रुपये ७५०/- |
| ४ | एक किंवा दोन दिवसांची कार्यशाळा (सार्वजनिक व इतर सुटटीच्या दिवशी धरुन)<br>**निवासी -**<br>**अनिवासी -** | रुपये १५००/-<br>रुपये १०००/- |
| ५ | बहिस्थ प्रशिक्षण कार्यक्रम | रुपये ७५०/- |

वरील प्रशिक्षण शुल्क दिनांक ०१ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३१ मार्च २०१३ या कालावधीत घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लागू रहातील.

*सही/-*
**(डॉ. संजय चहांदे)**
महासंचालक, यशदा

प्रति,

- **मा. उपमहासंचालक तथा संचालक**, रा. ग्रा. वि. सं., यशदा
- **मा. निबंधक**, यशदा
- **मा. वित्तीय सल्लागार**,यशदा
- **मा. लेखाधिकारी**, यशदा
- **सहकारी संस्था** (संबंधित)